THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 20TH FEBRUARY 1890.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### सन १८९० चा नंबर ३.

**सन १८८१ चा हिंदुस्तानचा कारखान्यांविषयीं आक्ट सुधारण्याबाबद आक्टाचा मसुदा.**

ज्या अर्थी सन १८८१ चा हिंदुस्तानचा कारखान्यांविषयींचा आक्ट सुधारणें योग्य आहे; त्या अर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें कायदा ठरविण्यांत येत आहे.

१. सदर्हू आक्टाच्या २ ऱ्या कलमांत "शंभर" या शब्दाबदल "वीस" हा शब्द दाखल करावा. (सन १८८१ चा आक्ट १५, कलम २, यांतील "कारखाना" या शब्दाच्या व्याख्येची सुधारणूक.)

२. सदर्हू आक्टाचीं कलमें ४, ५, ६ व १६ यांत "सात" या शब्दाबदल "नऊ" हा शब्द दाखल करावा. (सन १८८१ चा आक्ट १५, कलमें ४, ५, ६ व १६ यांची सुधारणूक.)

३. सदर्हू आक्टाच्या ४ थ्या कलमांत "दिलेल्या वेळाहून ज्यास्त वेळपर्यंत" या शब्दांनंतर "किंवा स्त्रियांस कामावर लावण्यासाठीं या आक्टानें दिलेल्या वेळाहून जास्त वेळपर्यंत" हे शब्द घालावे. (सन १८८१ चा आक्ट १५, कलम ४, यांत मजकूर वाढविणें.)

४. (१) सदर्हू आक्टाच्या ७ व्या कलमाच्या पहिल्या रकमेबदल खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजेः— (सन १८८१ चा आक्ट १५, कलम ७, याची सुधारणूक.)

"कोणत्याहि एका दिवशीं कोणत्याहि कारखान्यांत कोणत्याहि स्त्रीस ११ तासांपेक्षां ज्यास्त आणि कोणत्याहि मुलास नऊ तासांपेक्षां ज्यास्त वस्तुतः कामावर लावूं नये."

(२) त्याच कलमाच्या दुसऱ्या रकमेंत "मुलास" या शब्दापूर्वीं "स्त्रीस किंवा" हे शब्द आणि "त्यास" या शब्दापूर्वीं "तिला किंवा" हे शब्द दाखल करावे.

(३) त्याच कलमाच्या शेवटल्या, रकमेंत "मूल कामावर लावलें आहे" या शब्दांबदल "स्त्री किंवा मूल वस्तुतः कामावर लावलें आहे" हे शब्द दाखल करावे.

सन १८८१ चा आक्ट १५, याच्या ८ व्या कलमाबद्दल नवीन कलम दाखल करणें.

५. सदहू आक्टाच्या ८ व्या कलमाबद्दल खालीं लिहिलेला मजकूर दाखल करावा, ह्मणजे:—

स्त्रियांस व मुलांस सुटीचे दिवस देणें.

"८. ज्या कारखान्यांत स्त्रिया किंवा मुलें कामावर लावलीं आहेत अशा कारखान्याच्या प्रत्येक वहिवाट करणारानें, प्रत्येक महिन्याच्या प्रारंभापूर्वीं, ज्या जातींच्या किंवा वर्गांच्या त्या स्त्रिया किंवा मुलें असतील त्या जातींप्रमाणें किंवा वर्गांप्रमाणें अगर इतर रीतीनें अशा महिन्यामध्यें निदान चार तरी दिवस, कारखान्यांत कामावर लाविलेल्या प्रत्येक स्त्रीकरितां किंवा मुलाकरितां सुटीचे दिवस ह्मणून ठरविले पाहिजेत, आणि याप्रमाणें ठरविलेल्या दिवसांची सूचना या कामासाठीं स्थानिक सरकार वेळोवेळीं नेमील त्या अमलदारास तावडतोब दिली पाहिजे.

"कारखान्याची वहिवाट करणारास, इन्स्पेक्टराची पूर्वीं मंजूरी घेऊन, या कलमाअन्वयें ठरविलेल्या कोणत्याहि दिवसाबद्दल त्याच महिन्यामध्यें दुसरा कोणता तरी दिवस नेमण्याचा अधिकार आहे.

"[कोणत्याहि] स्त्रीकरितां किंवा मुलाकरितां सुटीचा दिवस ह्मणून जो दिवस या कलमाअन्वयें ठरविला असेल त्या दिवसाबद्दल दुसरा कोणता तरी दिवस या कलमांत वर सांगितल्याप्रमाणें नेमिला नसल्यास त्या ठरविलेल्या दिवशीं अशा कारखान्यांत त्या स्त्रीस किंवा मुलास कामावर लावूं नये; आणि बदला दिवस नेमिला असेल तर अशा बदला नेमिलेल्या दिवशीं अशा कारखान्यांत त्या स्त्रीस किंवा मुलास कामावर लावूं नये."

१८८१ चा आक्ट १५, कलमें ९ याची सुधारणूक.

६. सदहू आक्टाच्या ९ व्या कलमांत, "जें मूल, त्याच दिवशीं दुसऱ्या कोणत्याहि कारखान्यांत कामावर लावलेलें होतें असें त्यास माहित असेल त्या कोणत्याहि मुलास" या शब्दांबद्दल "जी स्त्री किंवा जें मूल त्याच दिवशीं दुसऱ्या कोणत्याहि कारखान्यांत आधींच कामावर लावलेलें आहे असें त्यास माहित असेल तशा कोणत्याहि स्त्रीस किंवा मुलास" हे शब्द दाखल करावे.

१८८१ चा आक्ट १५, कलम १५, याची सुधारणूक,

७. (१) सदहू आक्टाच्या १५ व्या कलमाच्या (अ) रकमेंत "कोणत्याहि मुलास" या शब्दांबद्दल "कोणत्याहि स्त्रीस किंवा मुलास" हे शब्द आणि त्याच कलमांतील दुसऱ्या विशेष ठरावांत, "दोन किंवा अधिक मुलें" या शब्दांबद्दल "दोन किंवा अधिक स्त्रिया अगर मुलें" हे शब्द व "प्रत्येक मुलाबाबत" या शब्दांबद्दल "प्रत्येक स्त्रीबाबद किंवा मुलाबाबद" हे शब्द दाखल करावे.

(२) त्याच कलमाच्या (ई) व (फ) रकमांबद्दल खालीं लिहिलेल्या ह्मणजे:—

"(ई) कोणत्याहि कारखान्यांत कोणतेंहि यंत्र अगर मिल-गियरिंग कुडण्यास हयगय करील;

(फ) कोणत्याहि कारखान्यांत कामावर लावलेल्या मनुष्यांच्या उपयोगाकरितां पाण्याचा पुरवठा राखण्यास हयगय करील;

(ग) कोणत्याहि कारखान्यांत हवा खेळेल असें करण्यास, किंवा कोणताहि कारखाना स्वच्छ स्थितींत ठेवण्यास आणि कोणत्याहि मोरीपासून, संडासापासून किंवा इतर घाणीपासून निघणाऱ्या दुर्गंधांचा त्यांत प्रवेश न होई असें करण्यास हयगय करील;

(ह) कोणत्याहि कारखान्यांत, तेथें कामावर लाविलेल्या मनुष्यांच्या आरोग्यास अपकारक होईल अशा रीतीनें, त्यांत काम चालत असतांना अतिशय दाटी होऊं देईल; किंवा

(आय्) कोणतीहि सूचना देण्यास किंवा कोणतेंहि पत्रक देण्यास हयगय करील."

या रकमा दाखल कराव्या.

८. (१) सदहू आक्टाच्या १८ व्या कलमाच्या रकमा (ब), (क) व (ड) यांबदल खालीं लिहिलेल्या रकमा दाखल कराव्या, ह्मणजेः— सन १८८१ चा आक्ट १५, कलम १८, याची सुधारणूक.

"(ब) कारखान्यांत कामावर लावलेल्या मनुष्यांच्या उपयोगाकरितां पाण्याचा परवठा राखणें;

(क) कारखान्यांमध्यें हवा खेळणें, आणि ते स्वच्छ ठेवणें (यांत, चुना देणें, रंग देणें, रोगण लावणें व धुणें यांचा समावेश होतो,) आणि कोणत्याहि मोरीपासून, संडासापासून किंवा इतर घाणीपासून निघणाऱ्या दुर्गंधांचा त्यामध्यें प्रवेश न होई असें करणें;

(ड) कारखान्यांमध्यें, तेथें कामावर लाविलेल्या मनुष्यांच्या आरोग्यास अपकारक होण्याजोग्या रीतीनें, त्यांमध्यें काम चालत असतांना अतिशय दाटी होऊं देण्याची मनाई करणें;

(ई) स्थानिक इन्स्पेक्टर किंवा स्थानिक सरकार यांनीं मागणी केली असतां व त्या मागणीस अनुसरून नैमित्तिक अगर नियमित वेळीं सादर करावयाचीं खरीं पत्रकें देण्याची कारखान्यांच्या वहिवाट करणारांची आवश्यकता;

(फ) कारखान्यांची पाहणी करणें;

(ग) या आक्टाअन्वयें करावयाचीं अपिलें कोणत्या रीतीनें करावीं व कोणत्या रीतीनें त्यांचा इन्साफ करावा ती रीति; आणि

(ह) इतर रीतीनें या आक्टाचे हेतु सिद्धीस नेणें."

(२) त्याच कलमांत, खालीं लिहिलेला मजकूर वाढवावा; तो येणेंप्रमाणेंः—

"या कलमाची रकम (ब), रकम (क) किंवा रकम (ड) याअन्वयें कानू करण्यापूर्वीं स्थानिक सरकारानें, योजिलेल्या कानूंचा खर्डा, हितसंबंध असलेल्या मनुष्यांना माहिती देण्यासाठीं आपणास वत वाटेल त्या रीतीनें प्रसिद्ध केला पाहिजे व त्याबरोबर, ज्या तारखेस किंवा तारखेनंतर त्या खर्ड्यांचा विचार केला जाईल ती तारीख निर्दिष्ट करून एक नोटीस प्रसिद्ध केली पाहिजे, आणि अशा निर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वीं सदहू खर्ड्याच्या संबंधानें कोणत्याहि मनुष्याकडून जी कोणतीहि हरकत किंवा सूचना येईल तिचा त्या सरकारानें विचार केला पाहिजे.

९. कोणत्याहि कायद्यांत किंवा दस्तऐवजांत, सन १८८१ चा हिंदुस्तानचा कारखान्यांविषयीं आक्ट यावर हवाला दिला असेल तो, या आक्टावरून सुधारला आहे त्याप्रमाणें त्या आक्टावर दिला आहे असें समजून तो हवाला वाचावा. सन १८८१ चा आक्ट १५, यावर दिलेले हवाले, या आक्टावरून सुधारला आहे तशा त्या आक्टावर दिलेले आहेत असें समजून ते हवाले वाचावे.

---

## हेतु व कारणें यांचें निरूपण.

सन १८८१ चा हिंदुस्तानचा कारखान्यांविषयीं आक्ट याचा अमल कसा चालू आहे याबाबद स्थानिक सरकारांच्या रिपोर्टांचा, आणि मुंबई इलाख्यांत कारखान्यांचें काम कसें चाललें आहे याबाबद विचार करण्याकरितां सन १८८४ सालीं नेमिलेल्या कमिशनानें चालविलेल्या कामांचा नुक्ताच विचार केल्यावरून हिंदुस्तान सरकारास असें वाटतें कीं, सन १८८१ चा सदहू आक्ट, जेणें करून—

(अ) विसांहून कमी नाहींत इतकीं मनुष्यें ज्या कोणत्याहि कारखान्यांत कामावर लाविलेलीं असतील तो कारखाना या आक्टाच्या अमलाखालीं आणतां येईल,

(ब) ज्या वयाच्या खालच्या मुलास कारखान्यांत कामावर लावतां नये त्या वयाची मर्यादा सात वर्षांची आहे ती वाढवून नऊ वर्षांची करतां येईल,

(क) कोणत्याहि एका दिवशीं स्त्रियांनीं काम करावयाच्या वेळेची मर्यादा अकरा तासांची ठरवितां येईल,

(ड) मुलांना सुटीचे दिवस देण्याबाबदचे सदहू आक्टाचे ठराव स्त्रियांस लागू करितां येतील, आणि कारखान्यांत कामावर लाविलेल्या स्त्रियांस व मुलें यांच्या निरनिराळ्या वर्गांच्या किंवा जातींच्या मानानें त्यांना आतिशय सोईवार पडतील ते दिवस कारखान्यांच्या वहिवाट करणारांस सुटीचे दिवस ठरवितां येतील,

(ई) स्थानिक गरजा असतील त्याप्रमाणें आरोग्यरक्षणाबाबद कानू करण्याचा स्थानिक सरकारांस अधिकार मिळेल, आणि

(फ) सरकार वेळोवेळीं मागेल ती माहिती देण्याचें कारखान्यांच्या वहिवाट करणारांना भाग पाडतां येईल,

आशा रीतीनें सुधरला पाहिजे.

यास्तव या मसुद्याचा हेतु सदहू आक्ट सदहूप्रमाणें सुधारणें हा होय.

हा मसुदा (कलम ९) याचा प्रसंगवशात् ज्या कायद्यांशीं संबंध पोंहचतो ते कायदे सन १८८७ चा विजेसंबंधी आक्ट, सन १८८८ चा मुंबई शहरचा म्युनिसिपल आक्ट आणि सन १८८९ चा हिंदुस्तानचा व्यापारी मालावरच्या निशाण्यांबाबदचा आक्ट हे होत.

(सही) आण्ड्र्यु आर. स्कोबल,

तारीख ३१वी माहे जानेवारी, सन १८९०.

(True Translation.)

Y. M. KELKAR,

Oriental Translator to Government.

BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.